## प्रेस नोट

दिनांक ०७/०९/२०२१

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पाणिपुरवठा विभाग फ व ग वॉर्ड येथील प्रभारी कनिष्ठ अभियंता व खाजगी इसमास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | रामनगर पोलीस स्टेशन, डोंबिवली |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **१) सुनिल नारायण वाळंज, वय ४९ वर्षे, प्रभारी कनिष्ठ अभियंता, कल्याण डोंबिवली महानगरपालिका**<br>**२) रविंद्र हरिश्चंद्र डायरे, वय ३९ वर्षे, लायसन्स प्लंबर** |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ५०००/–रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४०००/–रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून एका नविन घराकरीता पिण्याच्या पाण्याची नवीन लाईन मंजूर करून त्याची वर्क ऑर्डर काढून देण्याकरीता वरील नमुद लोकसेवक क्र १ यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,०००/–रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४,०००/–रुपये स्विकाण्याचे निश्चित केले.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०६/०७/२०२१ रोजी पडताळणी केली असता, लोकसेवक क्र. १ यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करून खाजगी इसम क्र.२ यांचेकडे देण्यास सागितल्याचे निष्पन्न झाल्याने अे.सी.बी., ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करून खाजगी इसम **रविंद्र हरिश्चंद्र डायरे** यांना तक्रारदार यांच्याकडून ४,०००/–रुपये लाचेची रक्कम स्विकारताना रामनगर डोंबिवली येथे रंगेहात पकडण्यात आले व लोकसेवक क्र १ **सुनिल नारायण वाळंज** यांना ताब्यात घेण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री नं :– **१०६४**

दुरध्वनी क्र. :– **०२२/२०८१३५९९**

व्हॉटस् ॲप क्र. :– **९९३०९९७७००**


( विलास मते )

पोलीस निरीक्षक

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे